**पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण, आकुर्डी,**
**पुणे-४११०४४.**
**दुरध्वनी क्रमांक ०२०-२७६५२९३४/२७६५२९३५**
**website:www.pcntda.org.in**
**Email:- pcntda@yahoo.com**


# पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण कार्यालयासाठी कंत्राटी पध्दतीने तारतंत्री, भूमापक व आरेखक पुरविणेबाबतची ई-निविदा .

**PIMPRI CHINCHWAD DEVELOPMENT AUTHORITY,**
**NEAR AKURDI RAILWAY STATION,**
**PUNE- 411 044**

**DETAIL TENDER PAPER FOR**

**TENDER NOTICE NO : ADMIN 03 FOR 2019-2020**

# TENDER PAPERS

# (e- Tender)

**NAME OF WORK : Appointment of wiremen, Serveyors, Draftsmen on Contract basis**

| | | |
|---|---|---|
| **Estimate Cost per year** | **Rs.** | **9,36,000/-** |
| **Tender Form Fee** | **Rs.** | **2,400/-** |
| **Earnest Money Deposit** | **Rs.** | **12,000/-** |

-----------------------------------------------------------------------------------------------

**Dy. Chief Executive Officer (Admin)**
**Pimpri Chinchwad New Town Development Authority**
**New Administrative Building, Near Akurdi**
**Railway Station, Pune-411 044.**

**Tel :- 020-27652934, 020-27166002,** **Fax : 020-27652935**

## पिंपरी  चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण, आकुर्डी, पुणे-४४

**दुरध्वनी क्रमांक  ०२०-२७६५२९३४/३५**
**वेब साईट:-** www.pcntda.org.in

## कंत्राटी तारतंत्री, भूमापक व आरेखक पुरविण्याबाबत.

**ई-निविदा सुचना क्रमांक Admin - ३ सन २०१९-२०**

मुख्य कार्यकारी अधिकारी, पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण आकुर्डी, पुणे-४४ खालील कामाकरीता नोंदणीकृत पुरवठाधारकाकडून (ठेकेदारांकडून) कंत्राटी तारतंत्री, भूमापक व आरेखक पुरविण्याबाबत ई- निविदा मागविण्यात येत आहेत.

| कामाचे नांव | कामाचा कालावधी | एक वर्षाचा अंदाजीत खर्च रु. ( Estimated cost) | बयाणा रक्कम रु. | ई-निविदा फॉर्म फी रु. |
|---|---|---|---|---|
| प्राधिकरणातील कार्यालयीन कामासाठी अंदाजे २ कंत्राटी तारतंत्री, भूमापक व आरेखक पुरविणेसाठी ई-निविदा. | १ वर्षे | ९,३६,०००/- | १२,०००/- | २४००/- |
| Online निविदा प्रसिध्दीचा व निविदा सादर करावयाचा दिनांक व वेळ | | | दि. १९/६/२०१९ रोजी सकाळी ११.०० वाजता पासून | |
| निविदा पूर्व बैठक | | | दि. २१/६/२०१९ रोजी सकाळी ११.०० वाजता | |
| निविदा सादर करण्याचा अंतिम दिनांक व वेळ | | | दि. २९/६/२०१९ रोजी सायंकाळी ५.४५ पर्यंत | |
| निविदा उघडण्याचा दिनांक | | | दि. १/७/२०१९ वेळ दुपारी ४.०० वाजता | |

**टिप :-**

1. ई-निविदाबाबत सविस्तर माहिती, अटी व शर्ती या http://mahatenders.gov.in व www.pcntda.org.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहेत.
2. निविदेची फॉर्म फी २४००/- व बयाणा रक्कम रुपये १२,०००/- हे E-Payment द्वारे gateway mode द्वारे ICICI वेबसाईट वरील सुचनेप्रमाणे जमा करावी.

३. निविदेबाबतचे पुरवणी किंवा शुध्दीपत्रक हे वेब साईटवरच प्रसिध्द केले जाईल. यासाठी वर्तमानपत्रात जाहिरात दिली जाणार नाही.

४. ई-निविदासंदर्भात अधिक माहिती व सहायासाठी ०२०- २७६५२९३४/३५ या दुरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा.

सही/-
**मुख्य कार्यकारी अधिकारी**

## <u>अटी व शर्ती :-</u>

कंत्राटी तारतंत्री पुरवठा करणाऱ्या एजन्सीच्या नियुक्तीसाठी ई-निवीदा पध्दतीने अनुभवी पुरवठादाराकडून निविदा मागविण्यात येत आहे. ही निविदा लिफाफा क्र.१ तांत्रिक लिफाफा व लिफाफा क्र.२ दराचा लिफाफा या पध्दतीने upload करावी.

**१) लिफाफा क्र. १.**

**तांत्रिक लिफाफा**

**तांत्रिक लिफाफामध्ये खालील कागदपत्रांच्या स्कॅन केलेल्या प्रती जोडाव्यात.**

१. फॉर्म फी रुपये २४००/- व बयाणा रक्कम १२,०००/- भरल्याचे online payment receipt ची स्कॅन कॉपी
२. निविदाधारक / संस्था /आस्थापना असल्यास सही करण्याबाबतचे प्रतिनिधीचे प्राधिकारपत्र.
३. वस्तु व सेवा कर (राज्य वस्तु सेवा कर आणि केंद्र वस्तु व सेवा कर) नोंदणी प्रमाणपत्राची प्रत
४. भविष्य निर्वाह निधी नोंदणी प्रमाणपत्राची प्रत.
५. कामगार विमा योजना नोंदणी प्रमाणपत्राची प्रत.
६. अटी व शर्ती मान्य असल्याचे हमीपत्र
७. निविदाधारक कॉन्ट्रॅक्ट लेबर ॲक्ट १९७० अन्वये वैध परवानाधारक असल्याबाबतचे प्रमाणपत्र
८. मुंबई दुकाने व संस्था नियम वैध दाखला
९. निविदाधारकाची वार्षिक उलाढाल किमान १५ लाख असल्याबाबत चार्टर्ड अकाऊंटचा दाखला
१०. शासकीय/ निमशासकीय/महामंडळे/स्थानिक संस्था कार्यालयाकडे सलग १ वर्ष किमान १० कर्मचारी पुरविले असल्याबाबतचा कार्यालयाकडील अनुभवाचा दाखला (संबंधित विभागाचा खातेप्रमुख / विभागप्रमुख यांच्याकडून प्रमाणपत्र घेऊन) सादर करणे बंधनकारक राहील. पुरावे सादर न केल्यास अनुभवाचा दाखला ग्राह्य धरता येणार नाही.
११. उपरोक्त १० कर्मचाऱ्यांचे ईएसआय, पीएफ, कामगार कल्याण निधी भरल्याबाबतचे पुरावे.
१२. निविदेच्या रकमेइतका चार्टर्ड अकाऊंटटकडील बीड कपॅसिटी दाखला जोडणे आवश्यक आहे.
१३. निविदाधारकाने मागील ३ वर्षाचे सेवाकर भरलेबाबतचे प्रमाणपत्र. वर्ष २०१५-१६, २०१६-१७ व २०१७-१८
१४. मागील ३ वर्षांचे आयकर विवरणपत्रासह चार्टर्ड अकाऊंटट (CA) चे प्रमाणपत्र .
१५. निविदाधारकाचे पॅनकार्ड
१६. मागील ३ वर्षे व्यवसाय कर भरल्याबाबतची प्रमाणपत्रे.

वर नमुद केलेली कागदपत्रे लिफाफा क्र.१ मध्ये सादर करणे आवश्यक आहे.

**ब) लिफाफा क्र. २**

**दराचा लिफाफा :-**

दराच्या लिफाफ्यामध्ये सोबत जोडलेल्या परिशिष्ट -२ नुसार पुढील बाबी नमूद करून दरपत्रक सादर करावे.

**कामाचा प्रकार कंत्राटी तारतंत्री, भूमापक व आरेखक पुरविणे.**

| अ.क्र. | Pay Details | रक्कम |
|---|---|---|
| 1 | Basic | 5800 |
| 2 | Special allowance | 3645 |
| 3 | **Total 'A'** | 9445 |
| 4 | HRA 5% on total - A | 472 |
| 5 | Provident fund 13.36% on total - A | 1242 |
| 6 | ESI 4.75% on total A + HRA | 471 |

| | | |
|---|---|---|
| 7 | Bonus ( Total A * 8.33% | 787 |
| 8 | Leave with wages 4% on total - A | 378 |
| 9 | Paid Holiday 1% on total - A | 94 |
| 10 | Labour Welfare Fund | 6 |
| 11 | **Total -B** | 12895 |
| 12 | Service Charge on total B | |
| 13 | **Total C** | |
| 14 | GST 18% on total - C | |
| 15 | **Gross Total** | |

टिप :- उपरोक्त अ.क्र.1 ते 11 येथील तपशील हा ठेकेदाराने कर्मचाऱ्यांना द्यावयाचे वेतन व भत्ते तसेच संबंधित व्यवस्थापनाकडे भरावयाचे शुल्क, भत्ते व कर याचा आहे. या वेतन व भत्ते यांचा लाभ संबंधित कर्मचाऱ्यास मिळणे बंधनकारक आहे. त्यामुळे अ.क्र. 1 ते 11 येथील तपशील हा न बदलणारा असून ठेकेदारास निविदा भरताना त्यात बदल करता येणार नाही.

अ.क्र. 12 येथे निविदाधारकाने कंत्राटी कर्मचाऱ्यांचा पुरवठा करण्यासाठी घेऊ इच्छित असलेल्या service charge ची टक्केवारी व त्यानुसार येणारी रक्कम नमूद करावयाची आहे. अनुक्रमांक13 येथे अ.क्र. ११+१२ येथील रकमांची बेरीज करून एकत्रित रक्कम नमूद करावयाची असून त्या रक्कमेवर 18 % ने येणारा GST अ.क्र. 14 येथे नमूद करावयाचा आहे. तर अ.क्र.15 येथे अ.क्र. 13+14 यांची एकत्रित रक्कम नमूद करावयाची आहे.

लिफाफा क्र.२ दराच्या लिफाफ्यामध्ये उपरोक्त दराचा तक्ता सूचनेप्रमाणे भरून निविदाधारकाच्या स्वाक्षरीसहीत सादर करावयाचा आहे. (दराचा लिफाफा नमुना परिशिष्ट ब सोबत जोडले आहे.)

## निविदेबाबतच्या अटी आणि शर्ती

१. निविदा फॉर्म फी रु. २४०० असून ती epayment व्दारे भरणे आवश्यक आहे. फॉर्म फी भरली नसल्यास निविदा विचारात घेतली जाणार नाही.

२. निविदा भरताना बयाणा रक्कम रू.१२,०००/- epayment व्दारे भरणे आवश्यक आहे. बयाणा रक्कम भरलेली नसल्यास निविदा विचारात घेतली जाणार नाही. निविदा स्वीकृतीनंतर अपात्र निविदा धारकांची बयाणा रक्कम परत केली जाईल. परंतू त्यावर व्याज दिले जाणार नाही.

३. निविदा स्वीकृत झाल्यानंतर १ वर्षाच्या कालावधीसाठी २ कंत्राटी तारतंत्री, २ भूमापक व २ आरेखक पुरविण्याची जबाबदारी पुरवठादारावर राहील.

४. या १ वर्षाच्या कालावधीतील कामकाज समाधारकारक असेल तरच पुढील १ वर्षासाठी मुदतवाढ दिली जाईल.

५. सदर कामाकरीता निवड झालेल्या पुरवठादारास रु. ८०,०००/-किंवा स्वीकृत निविदा रकमेप्रमाणे १ महिन्याचे परिश्रमिक यापैकी जास्त असेल ती रक्कम सुरक्षा अनामत रक्कम म्हणून भरावी लागेल. सदर रक्कम डी डी व्दारे CEO PCNTDA यांच्या नावे करारनामा करतेवेळी प्राधिकरण कार्यालयाच्या खात्यामध्ये जमा करावी लागेल. सदर सुरक्षा अनामत रकमेवर व्याज दिले जाणार नाही.

६. ज्या निविदाधारकाची निविदा मंजूर होईल त्या निविदाधारकास इरादापत्र देण्यात येईल. निविदाधारकास योग्य रकमेची स्टॅम्प फी भरून करारनामा करावा लागेल.

७. निविदा सादर केल्यापासून १२० दिवसांचा कालावधी ग्राह्य राहील.

८. उपरोक्त कामासाठी निविदेचा कालावधी १ वर्ष राहील.

९. निविदा स्वीकृत करणे अथवा नाकारणेचा हक्क पूर्णपणे मुख्य कार्यकारी अधिकारी प्राधिकरण यांच्याकडे राखीव आहे त्यांचा निर्णय अंतिम व कायदेशीर बंधनकारक राहील.

१०. कामाचे विधीवत कार्यक्षेत्र पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण क्षेत्र राहील.

११. लिफाफा क्र. २ मध्ये दर नमूद करताना निविदाधारकाने अ.क्र. १ ते ११ येथील रकान्यात दिलेल्या रकमेमध्ये कोणताही बदल करावयाचा नाही. अ.क्र. १२ ते १५ या रकान्यामध्ये service charge व GST बाबत आवश्यक ती रक्कम दिलेल्या सूचनेनुसार नमूद करावयाची आहे.

१२. निविदाधारक हे कॉन्ट्रॅक्ट लेबर (Regulation & Abolition) ॲक्ट १९७० अन्वये वैध परवानाधारक असला पाहिजे.पुरवठादाराने किमान वेतन कायद्यानुसार सेवकांना वेतन दिले पाहिजे व सदर वेतन सेवकांस धनादेशाव्दारे अगर ईसीएस व्दारे परस्पर बँकेत जमा करणे बंधनकारक राहील. रोख वेतन अदा करता येणार नाही.

१३. सर्व्हिस चार्ज २ % पेक्षा कमी आकारून सादर केलेली निविदा ग्राह्य धरण्यात येणार नाही.

१४. निविदाधारकाने रजिस्ट्रेशन, इएसआय कोड नं. ई.पी.एफ., कोड नं., पॅन नं. इत्यादीची कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे. सरकारी/निमसरकारी/कारखाने/महामंडळ/स्थानिक संस्था कार्यालयाकडे सलग किमान १ वर्षासाठी कमीत कमी १० कंत्राटी कामगार पुरविले बाबतचा अनुभवाचा दाखला व त्या कामगाराचे ईएसआय, ईपीएफ भरले बाबतचे पुरावे सादर करणे बंधनकारक राहील. ईएसआय, ईपीएफ भरले बाबतचे पुरावे सादर न केल्यास अनुभवाचा दाखला ग्राह्य धरण्यात येणार नाही.

१५. निविदाधारकाची वार्षिक उलाढाल किमान १५ लाख असलेबाबत चार्टर्ड अकाऊंटटंकडील दाखले, जोडणे आवश्यक आहे.

१६. निविदासोबत निविदाधारकाने बीड कपॅसिटी जोडणे आवश्यक आहे. बीड कपॅसिटी चार्टर्ड अकौंटंट यांच्या लेटर वर त्यांच्या सही शिक्यानिशी निविदाधारकाच्या संस्थेचा उल्लेख केलेला असणे आवश्यक आहे.

१७. रू.१२,०००/-इतकी बयाणा रक्कम ईसीएस/आरटीजीएस/एनईएफटी याव्दारे ऑनलाईन भरलेली पाहिजे. बयाणा रक्कम ही निविदा फॉर्म विक्री दिनांक ते निविदा स्विकृती दिनांक या कालावधीमधील असावी अन्यथा निविदेचा विचार केला जाणार नाही.

१८. बयाणा रकमेपोटी बॅक गॅरंटी डी.डी.अथवा चेक स्विकारला जाणार नाही.

१९. पुरवठादाराने निविदा मान्य झाल्यावर योग्य त्या किमतीच्या स्टॅम्प पेपरवर स्वखर्चाने करारनामा लिहून दिला पाहिजे.

२०. ज्या निविदाधारकांची कंत्राटी पध्दतीने कर्मचारी पुरविण्याची क्षमता किमान १५ संख्येपेक्षा जास्त आहे. ज्यांना किमान १ वर्षाचा पुर्वानुभव आहे व ज्यांची वार्षिक उलाढाल किमान रुपये १५ लाखापेक्षा जास्त आहे अशा निविदाधारकांच्या निविदा विचारात घेतल्या जातील. या अटी पुर्ण न करणाऱ्या निविदिधारंकाच्या निविदा अपात्र समजण्यात येवून त्या नाकारण्यात येईल.

## इतर सर्वसाधारण अटी व शर्ती

१. पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण कार्यालयासाठी कंत्राटी तारतंत्री पुरविण्याचा निविदा भरताना सर्व अटी व शर्ती वाचून निविदा भरावी मागाहून कोणतीही तक्रार ऐकून घेतली जाणार नाही.

२. ई निविदा भरताना सर्व माहिती परिपूर्ण भरावी. अर्जात मजकूर सामावणे शक्य नसल्यास अथवा त्याविषयी काही अधिक स्पष्टीकरण द्यावयाचे असल्यास स्वतंत्र कागदावर लिहून ते फॉर्मसोबत ऑनलाईन प्रणालीमध्ये सादर करावेत.

३. आवश्यकता असल्यास कार्यालयाने मागणी केल्याप्रमाणे २ पेक्षा जास्त कंत्राटी तारतंत्री / भूमापक / आरेखक पुरवावे लागतील.

४. निविदा कालावधीमध्ये पुरवठादारास कार्यालयाने मागणी केल्यास २ अथवा त्यापेक्षा जास्त अथवा त्यापेक्षा कमी कंत्राटी तारतंत्री / भूमापक / आरेखक पुरवावे लागतील. कमी अथवा जास्त संख्येबद्दल पुरवठादारास तक्रार करता येणार नाही.

५. या कार्यालयाने जास्त कंत्राटी कर्मचारी पुरविण्याचे आदेश दिल्यानंतर आदेशामध्ये नमूद केलेल्या मुदतीत आवश्यक कर्मचारी पुरविले नाही तर जेवढ्या कर्मचाऱ्यांची जरूरी असेल तेवढे कर्मचारी वाटेल त्या पुरवठादाराकडून पडेल त्या दराने उपलब्ध करून घेण्याचा मुख्य कार्यकारी अधिकारी यांना हक्क राहील. जर निविदा दरापेक्षा जास्त दराने ठेका पध्दतीने कर्मचारी लागले तर जेवढी रक्कम जास्त द्यावी लागेल तेवढ्या रकमेची भरपाई करण्याची जबाबदारी पुरवठादारावर राहील. शिवाय सदरची रक्कम पुरवठादारास द्यावयाच्या बिलाच्या रकमेतून अगर निविदेच्या हमीदाखल ठेवलेल्या रकमेतून कापून घेण्याचा मुख्य कार्यकारी अधिकारी यांना हक्क राहील. निविदेपेक्षा कमी दरात दुसरीकडे ठेका पध्दतीने कर्मचारी मिळाल्यास या कार्यालयाच्या होणाऱ्या बचतीवर पुरवठादाराचा काही हक्क राहणार नाही. सदर प्रकरणी बाहेरच्या संस्थेकडून/एजन्सीकडून कर्मचारी का घेतले केला असा मुद्दा पुरवठादारास उपस्थितीत करता येणार नाही.

६. आदेश दिल्यानंतर पुरवठादाराने आदेशाची पूर्तता करण्यासाठी आणलेले कर्मचारी खालील परिस्थितीत नाकारण्याचा अधिकार या कार्यालयास राहील.
(अ) कर्मचारी आवश्यक त्या शैक्षणिक आर्हतेचे नसल्यास,
(ब) आदेशामध्ये नमूद केलेल्या मुदतीत कर्मचारी न पुरविल्यास, किंवा
(क) आदेशामध्ये नमूद केलेले सर्व कर्मचारी न पुरविल्यास.

७. प्रत्येक महिन्यात जितके कंत्राटी कर्मचारी पुरविले असेल तितक्या कर्मचाऱ्यांची बिले पुढील महिन्याच्या पाच तारखेच्या आत सादर केली पाहिजेत.
प्रत्येक बिल त्यात सर्व तपशील असल्याशिवाय विचारात घेतले जाणार नाही व बिलाची रक्कम दिली जाणार नाही.

८. पुरवठादार यांनी प्रॉव्हिडंट फंड कायद्याअंतर्गत आपला हिस्सा आणि सेवक यांचा हिस्सा प्रॉव्हिडंट फंड ऑफिसमध्ये, तसेच ईएसआय, कामगार कल्याण निधी व जीएसटी नियमाप्रमाणे भरला पाहिजे. त्यानुसार पुरवठादाराने सर्व कर्मचाऱ्यांचा प्रोव्हिडंट फंड, ईएसआय कामगार निधी व जीएसटी भरल्याबाबतचे पुरावे दर महिना बिलासोबत सादर करणे आवश्यक आहे. त्याशिवाय बिल अदा केले जाणार नाही.

९. पुरवठादाराने त्यांचेकडील कामगारांना ई.एस.आय. सुविधा देणे बंधनकारक आहे.

१०. पुरवठादार यांनी लेबर लॉ अंतर्गत येणाऱ्या सर्व बाबी, कामगार विषयक कायद्याची पुर्तता न केल्यास एखादा प्रश्न उदभवल्यास त्याची सर्व जबाबदारी पुरवठादार यांचे वर राहील .

११. पुरवठादाराने कंत्राटी कर्मचाऱ्यांना पगाराची रक्कम व वजावटीचा तपशील नमूद करून पगाराची पावती देणे बंधनकारक आहे.

१२. अ) कंत्राटी तारतंत्री यांचेकडे खालील पात्रता असणेआवश्यक राहील.
1) मान्यताप्राप्त माध्यमिक शाळेची १० वी (S.S.C.) परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक
२) शासनाच्या औद्योगिक प्रशिक्षण संस्था किंवा शासन मान्य संस्थेतून किमान २ वर्षाचा विद्युत व्यावसायिक किंवा तारतंत्री आभ्यासक्रम उत्तीर्ण असणे आवश्यक
३) कंत्राटी तारतंत्री म्हणून काम केल्याचा १ वर्षाचा अनुभव असणे आवश्यक

ब) कंत्राटी भूमापक यांचेकडे खालील पात्रता असणेआवश्यक राहील.

1) मान्यताप्राप्त माध्यमिक शाळेची १० वी (S.S.C.) परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक

२) शासनाच्या औद्योगिक प्रशिक्षण संस्था किंवा शासन मान्य संस्थेमधून सर्व्हेअर/ भूमापन विषयाचा आभ्यासक्रम उत्तीर्ण असणे आवश्यक

३) शासन मान्य संस्थेमधून संगणक प्रणालीचा Auto Cad आभ्यासक्रम उत्तीर्ण असणे आवश्यक.

४) कंत्राटी भूमापक म्हणून काम केल्याचा १ वर्षाचा अनुभव असणे आवश्यक.

क) कंत्राटी आरेखक यांचेकडे खालील पात्रता असणेआवश्यक राहील.

1) मान्यताप्राप्त माध्यमिक शाळेची १० वी (S.S.C.) परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक

२) शासनाच्या औद्योगिक प्रशिक्षण संस्था किंवा शासन मान्य संस्थेतून किमान २ वर्षाचा अनुरेखक अथवा तत्सम समतुल्य आभ्यासक्रम उत्तीर्ण असणे आवश्यक

३) शासन मान्य संस्थेमधून संगणक प्रणालीचा Auto Cad आभ्यासक्रम उत्तीर्ण असणे आवश्यक.

४) कंत्राटी आरेखक म्हणून काम केल्याचा १ वर्षाचा अनुभव असणे आवश्यक

कंत्राटी कर्मचाऱ्यांची संबंधित विभागामध्ये चाचणी घेण्यात येईल. चाचणी समाधानकारकरित्या उत्तीर्ण करणाऱ्या कंत्राटी कर्मचाऱ्यास रूजु करून घेण्यात येईल.

१३. पुरवठादाराने वर्क ऑर्डरप्रमाणे कंत्राटी कर्मचारी पुरविणे आवश्यक राहील. वर्क ऑर्डरपेक्षा कमी कंत्राटी कर्मचारी पुरविल्यास जितके कमी कंत्राटी कर्मचारी पुरविले असतील त्याप्रमाणे प्रति कंत्राटी कर्मचाऱ्यास रू.१००/- प्रती दिन प्रती कंत्राटी कर्मचारी दंड आकारण्यात येईल.

१४. पुरवठादाराने नियमाप्रमाणे सेवकांना आठवड्यातून एक भर पगारी साप्ताहिक सुट्टी देणे बंधनकारक राहील. ही सुट्टी रविवारी देण्यात यावी. दुसरा व चौथा शनिवार आणि ज्या दिवशी कार्यालय बंद असेल अशा दिवशी कार्यालयीन कामासाठी कंत्राटी कामगारांना बोलविण्यात आले नसल्यास त्यांचे वेतन कापून घेण्यात येवू नये. जर दुसरा व चौथा शनिवार या दिवशी कार्यालयीन कामासाठी कंत्राटी कामगारांना बोलविण्यात आले तर त्यांस येणे बंधनकारक असेल व त्याचा त्यांना वेगळा मोबदला मिळणार नाही.

१५. निविदेच्या कामाचा कालावधी पुर्ण होईपर्यंत संबंधित प्रकरणापोटी भरलेली सुरक्षा अनामत रक्कम परत केली जाणार नाही.

१६. कंत्राटी कर्मचारी पुरविताना संबंधित सेवकांची चारित्र्य पडताळणी करण्याची जबाबदारी पुरवठादाराची राहिल. पुरवठादार सेवकाकडून एखादा अनुसूचित प्रकार घडून कायद्याचे उल्लंघन झाल्यास पुरवठाधारकाची जबाबदारी राहील. यामध्ये प्राधिकरण कार्यालयाची कोणतीही कायदेशीर जबाबदारी राहणार नाही.

१७. नियुक्त केलेले कंत्राटी कर्मचारी पुरवठादाराचे कर्मचारी असतील, पुरविण्यात आलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्याचे वेतन हे किमान वेतन कायदयामधील तरतूदीप्रमाणे देण्याचे बंधन पुरवठाधारकावर राहील. वेतनाचा प्राधिकरणाशी संबंध राहणार नाही.

१८. पुरवठादाराने नेमलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्याची कार्यालयातील उपस्थिती नोंदविण्याकरिता कार्यालयात बायोमेट्रीक मशीन बसविण्याची जबाबदारी पुरवठादाराची आहे. त्यासाठी होणारा संपूर्ण खर्च पुरवठादाराने उचलावयाचा आहे.

१९. पुरवठादाराने नेमलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांना कार्यालयात हजर होताना व कार्यालय सोडताना बायोमेट्रीक प्रणालीवर त्यांची उपस्थिती नोंदविणे बंधनकारक आहे. सदर कंत्राटी कर्मचाऱ्यांची बायोमेट्रीकवरील नोंदी योग्य प्रकारे होत आहेत किंवा कसे हे पाहण्याची संपूर्ण जबाबदारी पुरवठादाराची आहे.

२०. पुरवठादाराने पुरवठा केलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांना किमान वेतन दरातील विशेष भत्यामध्ये शासनाकडून दर सहा महिन्यानी बदल केला जातो, त्यानुसार पुरवठादाराने पुरवठा केलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांना बदल केलेल्या विशेष भत्त्यासह वेतन देणे बंधनकारक आहे, असे वेतन पुरवठादाराने पुरवठा केलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांना दिल्यानंतर या कार्यालयामार्फत पुरवठादारास सुधारित विशेष भत्ता अदा केला जाईल.

२१. शासकीय विमा निधी कामगार कायदयानुसार किंवा महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी ठरवुन दिलेल्या नियमांची पूर्तता करणे पुरवठादारावर बंधनकारक राहील.

२२. पुरवठा करण्यात आलेल्या प्रत्येक कंत्राटी कर्मचाऱ्यांना कामगार कायद्यामधील नमुन्यामध्ये ओळखपत्र देणे बंधनकारक असुन कर्मचाऱ्यांचे ओळखपत्र स्पष्ट दिसेल, अशा ठिकाणी लावणे आवश्यक आहे व कामाच्या दिवशी सदर ओळखपत्र कर्मचाऱ्याकडे असणे बंधनकारक राहील.

२३. कंत्राटी पध्दतीने कर्मचारी पुरवठयाचा कालावधी हा सुरूवातीस एक वर्षाचा राहील. प्रथम फक्त १ वर्षासाठी कार्यादेश देण्यात येईल. काम समाधानकारक असल्यास दुसऱ्या वर्षासाठी कार्यादेश देण्यात येईल. काम समाधानकारक नसल्यास ३० दिवस अगोदर पूर्वसूचना देवून कधीही करार रद्द करण्यात येईल. करारनाम्याचा कालावधी कमी करण्याचा अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी प्राधिकरण यांना राहील.

२४. कंत्राटी कर्मचारी यांचे वेतन उशिरा दिल्यास करारनामाचा भंग झाला आहे असे समजले जाईल.

२५. पुरवठादारामार्फत काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या सेवेचे कोणतेही उत्तरदायीत्व प्राधिकरण कार्यालय अथवा शासनावर राहणार नाही.

२६. पुरविण्यात येणाऱ्या कर्मचाऱ्याची अर्हता अट क्र.१२ प्रमाणे असल्याबाबतची मुळ प्रमाणपत्रे तपासून घेऊन ते प्रमाणपत्र योग्य असल्याची खात्री पुरवठादाराने करणे आवश्यक आहे.

२७. पुरवठादाराने कंत्राटी कर्मचाऱ्यांना दिलेल्या वेतनाच्या / इतर भत्याच्या धनादेशाची छायांकित प्रत किंवा इ.सी.एस.द्वारे /एन.ई.एफ.टी.द्वारे वेतनाची रक्कम / इतर भत्याची रक्कम कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या बँक खात्यात जमा केल्याचे दर्शविणारे विवरणपत्र (Statement) आणि कंत्राटी कर्मचाऱ्यांची स्वाक्षरी असलेले वेतन देयक (ज्यावर संबंधित कंत्राटी कर्मचाऱ्याचा धनादेश क्रमांक / ई.सी.एस क्रमांक/ एन.ई.एफ.टी क्रमांक लिहिलेला असेल) पुरवठादाराने दरमहा प्राधिकरण कार्यालयास सादर करणे बंधनकारक राहील. जो पर्यंत पुरवठादार वरील कागदपत्रे कार्यालयास सादर करणार नाही तो पर्यंत त्या महिन्याचे पुरवठादाराचे देयक अदा करण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

२८. पुरवठादाराने दरमहा १ तारखेस कंत्राटी कर्मचाऱ्याना पारिश्रमीक देणे आवश्यक आहे. पारिश्रमिक अदा केल्यावरच त्यासंबंधीची बीले प्राधिकरण कार्यालयास सादर करणेत यावीत. त्यानंतर देय बिलाबाबत कार्यवाही करण्यात येईल.

२९. करारनामा करतेवेळी पुरवठादाराने रुपये ८०,०००/- अथवा पुरवठादाराच्या स्विकृत निविदा रक्कम प्रमाणे एक महिन्याचे एकूण पारिश्रमिक यापैकी जी रक्कम जास्त असेल ती रक्कम सुरक्षा ठेव म्हणून कार्यालयात भरणा करावी लागेल. निविदेचा कालावधी पूर्ण झाल्यानंतर सदर रक्कम पुरवठादारास बिनव्याजी परत करण्यात येईल.

३०. सद्य स्थितीमध्ये एकूण २ तारतंत्री, २ भूमापक व २ आरेखकांची आवश्यकता असून या मागणीच्या संख्येत बदल होऊ शकतो. या संख्येत वाढ किंवा घट होण्याची शक्यता आहे. त्याप्रमाणे पुरवठादारास कर्मचाऱ्याचा पुरवठा करावा लागेल.

३१. पुरवठादार व त्यांचे मार्फत पुरविण्यात येणारे कर्मचारी यांच्यात काही विवाद अथवा तंटा झाल्यास ती सोडविण्याची पूर्ण जबाबदारी पुरवठादारावर राहील.

३२. विशेष भत्ता वगळता स्विकृत केलेल्या दरामध्ये कोणत्याही सबबीवर करारनामा संपुष्टात येईपर्यंत पुरवठादारास दरवाढ मागता येणार नाही.

३३. पुरवठादाराने पुरवठा केलेले कर्मचारी हे आवश्यक शैक्षणिक पात्रतेचे नसल्यास किंवा पुरवठादाराने निविदामध्ये नमुद केलेल्या शर्ती आणि अटी याचे पालन केले नाही तर करारनामा कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल.

३४. प्राधिकरणाने वेळोवेळी दिलेल्या सुचनांचे पालन करणे पुरवठादारावर बंधनकारक राहील.

३५. कार्यालयाची वेळ सकाळी १०.०० ते सांय ५.४५ वाजेपर्यंतची आहे. कंत्राटी कर्मचारी हे एका महिन्यात २ दिवसापेक्षा जास्त वेळा उशीरा आल्यास ३ दिवसास एक दिवसाचे वेतन या प्रमाणात बिलातून कपात करण्यात येईल.

३६. कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या गैरवर्तणूकीबाबत / असमाधानकारक कामाबाबत पुरवठादारास पुर्वकल्पना न देता कामावरुन कमी करण्याचा अधिकार प्राधिकरणाने राखून ठेवला आहे.

३७. कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या ताब्यातील अथवा त्याच्याशी संबंधित असलेल्या प्राधिकरण कार्यालयाच्या सर्व चल / अचल मालमत्तेच्या सुरक्षितेची काळजी घेणे ही पुरवठादाराची जबाबदारी राहील. त्यास हानी पोहोचल्यास त्याची वसुली पुरवठादाराच्या देय रकमेतून करण्यात येईल.

३८. Contract Labour ( Regulation & Abolition) Act १९७० Employee's Provident Fund Act १९५२ Workmen's Compensation Act १९२३, Payment of Gratuity Act १९७२ आणि इतर प्रचलीत / अस्तित्वात असलेल्या कायद्या अंतर्गत कोणत्याही प्रकारची देय रक्कम देण्याविषयी प्राधिकरण जबाबदार नसून ही जबाबदारी पुरवठादाराची राहील.

३९. पुरवठादाराने नेमलेल्या कर्मचाऱ्याच्या अपघाताबाबतची कोणतीही जबाबदारी प्राधिकरण घेणार नाही. राज्य कामगार विमा योजने अंतर्गत कंत्राटी कर्मचाऱ्यांना विमा योजना लागू करण्याची सर्व जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

४०. केंद्र / राज्य सरकार तसेच त्यांची महामंडळे याच्या कोणत्याही तक्रारी , सुचना मतभेद याबाबतची कार्यवाही पुरवठादाराने प्राधिकरणास सहभागी न करता त्यांचे स्तरावर करावी.

४१. निविदा पूर्व बैठकीस किंवा निविदा उघडतेवेळी फक्त निविदाधारक किंवा प्राधिकृत प्रतिनिधी यांनाच उपस्थित राहणेची परवानगी दिली जाईल.

४२. या निविदेमधील शर्तीनुसार पुरवठादार वागला नाही व त्यामुळे या कार्यालयाचे नुकसान झाले तर नुकसानीची रक्कम ठेकेदाराच्या बिलाच्या रकमेतून, हमीच्या रकमेतून कापून घेण्याचा मुख्य कार्यकारी अधिकारी यांना हक्क राहील.

४३. या निविदेच्या व्यवहाराबाबत जी नोटीस, समज, ऑर्डर अगर पत्र टेंडरदारास दिले जाईल किंवा तो समक्ष न भेटल्यास अगर भेटून घेण्याचे टाळल्यास ती नोटीस, समज, ऑर्डर अगर पत्र त्याने निविदामध्ये दिलेल्या पत्त्यातील इमारतीच्या दर्शनी भागास चिकटविण्यात येईल व अशा तऱ्हेने बजावणी करण्यात येईल व त्याचप्रमाणे बजावणी केल्यानंतर सदरची नोटीस, समज, ऑर्डर अगर पत्र पुरवठादारास मिळाले असे समजण्यात येईल.

४४. वरील शर्तीपैकी कोणत्याही शर्तीचे पुरवठादाराकडून वक्तशीर पालन होत नाही असे दिसून आल्यास पुरवठादाराची निविदा ताबडतोब रद्द करण्याचा व अनामत रक्कम पूर्णत: अगर त्यापैकी योग्य वाटेल तेवढी रक्कम जप्त करण्याचा मुख्य कार्यकारी अधिकारी यांना हक्क राहील.

सही/-
मुख्य कार्यकारी अधिकारी

---

## परिशिष्ट ब

**लिफाफा क्र. २ दराचा लिफाफा (दरपत्रक)**

**कामाचा प्रकार कंत्राटी कर्मचारी पुरविणे.**

| अ.क्र. | Pay Details | रक्कम |
|---|---|---|
| 1 | Basic | 5800 |
| 2 | Special allowance | 3645 |
| 3 | **Total 'A'** | 9445 |
| 4 | HRA 5% on total - A | 472 |
| 5 | Provident fund 13.36% on total - A | 1242 |
| 6 | ESI 4.75% on total A + HRA | 471 |
| 7 | Bonus ( Total A * 8.33% | 787 |
| 8 | Leave with wages 4% on total - A | 378 |
| 9 | Paid Holiday 1% on total - A | 94 |
| 10 | Labour Welfare Fund | 6 |
| 11 | **Total -B** | 12895 |
| 12 | Service Charge on total B | |
| 13 | **Total C** | |
| 14 | GST 18% on total - C | |
| 15 | **Gross Total** | |

टिप :- उपरोक्त अ.क्र.1 ते 11 येथील तपशील हा ठेकेदाराने कर्मचाऱ्यांना द्यावयाचे वेतन व भत्ते तसेच संबंधित व्यवस्थापनाकडे भरावयाचे शुल्क, भत्ते व कर याचा आहे. या वेतन व भत्ते यांचा लाभ संबंधित कर्मचाऱ्यास मिळणे बंधनकारक आहे. त्यामुळे अ.क्र. 1 ते 11 येथील तपशील हा न बदलणारा असून ठेकेदारास निविदा भरताना त्यात बदल करता येणार नाही.

अ.क्र. 12 येथे निविदाधारकाने कंत्राटी कर्मचाऱ्यांचा पुरवठा करण्यासाठी घेऊ इच्छित असलेल्या service charge ची टक्केवारी व त्यानुसार येणारी रक्कम नमूद करावयाची आहे. अनुक्रमांक13 येथे अ.क्र. ११+१२ येथील रकमांची बेरीज करून एकत्रित रक्कम नमूद करावयाची असून त्या रक्कमेवर 18 % ने येणारा GST अ.क्र. 14 येथे नमूद करावयाचा आहे. तर अ.क्र.15 येथे अ.क्र. 13+14 यांची एकत्रित रक्कम नमूद करावयाची आहे.

ठिकाण:-

दिनांक:-

निविदाधारकाची सही

नाव:-

मोबाईल क्र.:-

ई मेल:-

परिशिष्ट अ

# हमीपत्र

मुख्य कार्यकारी अधिकारी, पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण, आकुर्डी, पुणे - ४४ यांनी कार्यालयीन दैनंदिन कामकाजाकरीता कंत्राटी कर्मचारी पुरविण्यासाठी मागविलेल्या ई-निविदेतील सर्व अटी व शर्ती मी वाचल्या असून सर्व अटी व शर्ती मला / आम्हाला मान्य आहेत.

दिनांक :-

ठिकाण:-

स्वाक्षरी:-

निविदाधारकाचे नांव:-

पत्ता:-

दुरध्वनी /मोबाईल क्र.:-

---

(टिप:- सदरील हमी पत्र तांत्रिक लिफाफा मधील अ.क्र. ६ साठी जोडावयाचे आहे.)